लोकमत

# मुल्ला यांच्या कुटुंबीयांना अंधारात ठेवून जमिनीचा व्यवहार

## सुमारे १५० कोटींचा भूखंड : गैरकारभार, फसवणूकप्रकरणी ट्रस्टींच्या विरोधात दावा दाखल होणार

**मधुकर ठाकूर**
लोकमत न्यूज नेटवर्क

**उरण :** ट्रस्टच्या मालमत्तेचा वापर पूर्णपणे सामाजिक कामासाठी करण्याचे बंधन असताना, उरण येथील मगदूमबीबी वक्फ ट्रस्टची पनवेल शहरात असलेली सुमारे १५० कोटी किमतीची जागा एका खासगी विकासकाला देण्यात आली आहे. ट्रस्टच्या सदस्यांना अंधारात ठेवून केलेल्या बेकायदा व्यवहाराविरोधात मुल्ला कुटुंबीयांनी उच्च न्यायालयात जाण्याचा निर्णय घेतला आहे.

उरण येथील मगदूमबीबी वक्फ ट्रस्टची पनवेल शहरात सर्व्हे नं. २८० मध्ये १०२७३ चौ.मी. इतक्या क्षेत्रफळाची जागा आहे. उरणचे माजी नगराध्यक्ष नुरमुल्ला यांचे कुटुंबीय या ट्रस्टचे सदस्य आहेत. आजच्या बाजारभावाप्रमाणे या जमिनीची किंमत १५० कोटी असून विकसित केल्यानंतर सुमारे ३५० कोटींच्या घरात जाणार आहे. १९२५ सालापासून नुरमुल्ला यांच्या आजी मगदूम बीबी यांनी या ट्रस्टच्या जमिनीचा वापर फक्त गरीब-गरजूंसाठीच व सार्वजनिक उपक्रमासाठीच करण्याचे मृत्युपत्रात नमूद केले होते.

त्यांच्या मृत्यूनंतर मुल्ला अहमद हमीद (भाऊ), मुल्ला अहमद हमीद मुख्य ट्रस्टी म्हणून ट्रस्टचा कारभार सांभाळत होते. त्यांच्या निधनानंतर युसुफ अब्दुल हमीद मुल्ला, हसीब युसुफ मुल्ला या दोन ट्रस्टींनी ट्रस्टचा कारभार सांभाळला. त्यानंतर सदर ट्रस्टची जागा मुल्ला मुत्तालिब, मुल्ला अब्दुल हमीद या ट्रस्टींनी जे. जे. रस्सीवाला यांना सार्वजनिक कामासाठी ५० वर्षांच्या लीजवर दिली होती. १९८२ साली अब्दुल हमीद मुल्ला यांचे निधन झाले.

नियमानुसार या लीजची मुदत वाढविण्याची तरतूद नाही. यामुळे २०११ - २०१२ या वर्षात लीजची मुदत संपुष्टात आली आहे. त्यामुळे ट्रस्टची पनवेल शहरात सर्व्हे नं. २८० मध्ये १०२७३ चौ.मी. जागा आपसूकच ट्रस्टच्या ताब्यात आली आहे.



ट्रस्टचा या भूखंडाची किंमत १५० कोटी रुपये आहे.

हे प्रकरण न्यायप्रविष्ट झाले आहे. त्यामुळे अधिक बोलणे उचित ठरणार नसल्याचे सांगत, ट्रस्टी हसीब युसूफ मुल्ला यांनी माहिती देण्यास नकार दिला.

ट्रस्टच्या मालमत्तेचा ताबा मिळाल्यावर ट्रस्टच्या सदस्यांना अर्थात उरण येथील ट्रस्टी म्हणून कार्यरत असलेल्या मुल्ला कुटुंबीयांना अंधारात ठेवून काही ट्रस्टनी बेकायदेशीरपणे ट्रस्टची सुमारे १५० कोटी रुपये किमतीची जमीन एका खासगी विकासकाला विकास करण्यासाठी दिली आहे. संपूर्णत: सार्वजनिक कामासाठीच जमिनीचा वापर करण्याचे बंधन असताना, काही ट्रस्टींनी ट्रस्टी असलेल्या उरणच्या मुल्ला कुटुंबीयांची फसवणूक करत विकासकासोबत २०१६ साली करारनामाही केला आहे.

या करारनाम्यात पनवेल शहरात सर्व्हे नं. २८० मधील १०२७३ चौ.मी. जागेपैकी ७० टक्के जागेवर इमारती, तर फक्त ३० टक्के जागेवर इस्पितळ उभारणी करण्यात येणार आहे. याबाबत विचारणा करण्यासाठी गेलेल्या मुल्ला कुटुंबीयांना बिल्डर्सच्या बाऊन्सर्सनी बैठकीतून बाहेर हुसकावून लावले असल्याचा आरोपही झैद मुल्ला यांनी केला आहे.

लोकमत

# मगदूम बीबी ट्रस्टचे कामकाज वक्फ, शासनाच्या नियमानुसारच-सोल ट्रस्टी

लोकमत न्यूज नेटवर्क

**उरण** : पनवेल शहरात असलेली मगदूम बीबी ट्रस्टची मालमत्ता विकासकाला देण्यासाठी कोणत्याही ट्रस्टींना अंधारात ठेवण्यात आलेले नाही. यामध्ये कोणत्याही प्रकारचा गैरप्रकारही झालेला नसल्याचा दावा सोल ट्रस्टी हसीब महम्मद युसूफ मुल्ला यांनी केला आहे.

उरण येथील मुल्ला कुटुंबीयांतील झैद मुल्ला यांनी मगदूम बीबी ट्रस्टची पनवेल शहरातील सर्व्हे नंबर.२८० मधील मालमत्ता विकासकाला देताना अन्य ट्रस्टींना अंधारात ठेऊन गैरप्रकार आणि फसवणूक केल्याचा आरोप झैद मुल्ला यांनी केला होता.

या आरोपांबाबत सोल ट्रस्टी हसीब महम्मद युसूफ मुल्ला यांनी सांगितले की, मगदूम बीबी ट्रस्टींशी झैद मुल्ला यांचा कोणताही संबंध नाही.त्यामुळे त्यांनी केलेले आरोप चुकीचे आणि निराधार आहेत. त्यामागच्या हेतू बाबतही सोल ट्रस्टींनी शंका उपस्थित केली आहे. ट्रस्टचे कामकाज वक्फ बोर्ड आणि शासनाच्या नियमानुसार सुरू आहे. यामध्ये कुठेही अनियमितता झालेली नाही. उलट मालमत्ता विकासकाला दिल्याने

मालमत्तेच्या भाड्यापोटी व मिळणाऱ्या उत्पन्नाच्या रकमेतून गोरगरिबांची सेवा आणि सामाजिक कार्यावरच खर्च केली जाणार असल्याचा दावा सोल ट्रस्टी हसीब महम्मद युसूफ मुल्ला यांनी केला आहे. काही नागरिकांकडून ट्रस्टच्या कामकाजाची चुकीची व बदनामीकारक माहिती समाजमाध्यम, वर्तमानपत्रात पसरवली जात आहे. यामुळे ट्रस्टची नाहक बदनामी केली जात आहे. ट्रस्टची बदनामी करणाऱ्यांवर न्यायालयात अब्रू नुकसानीचे खटले दाखल करण्याचा मनसुबाही सोल ट्रस्टी हसीब महम्मद युसूफ मुल्ला यांनी जाहीर केला आहे.




## 'आरोप चुकीचे आणि निराधार'

या आरोपांबाबत सोल ट्रस्टी हसीब महम्मद युसूफ मुल्ला यांनी सांगितले की, मगदूम बीबी ट्रस्टींशी झैद मुल्ला यांचा कोणताही संबंध नाही.त्यामुळे त्यांनी केलेले आरोप चुकीचे आणि निराधार आहेत.